प्रेसनोट

दिनांक –०३/११/२०२३

महाराष्ट्र राज्य विदुत वितरण कंपनीचे तंत्रज्ञ (वायरमन) यांचेविरूध्द लाच मागणी केल्याचा गुन्हा दाखलबाबत.

| | | |
|---|---|---|
| १ | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर |
| २ | गुन्हा नोंद कमांक | पेल्हार पोलीस ठाणे, जिल्हा पालघर |
| ३ | कलम | भ्र.प्र.अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| ४ | लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आरोपीत लोकसेवक दशरथ प्रकाश गायकवाड, वायरमन, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्या., कार्यालय संतोष भुवन, नालासोपारा पुर्व (वर्ग –४) |
| ५ | मागितलेल्या लाचेची रक्कम | ५,४००/– रु. तडजोडीअंती ४,०००/–रुपये. |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | –– |
| ७ | थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार हे इलेक्ट्रीक सल्लागार म्हणुन काम करतात. ते नागरिकांची म.रा.वि.वि.कार्यालयाशी संबधित असलेली कामे त्यामध्ये नवीन मिटर जोडणी करून देणे, तसेच ग्राहकांच्या नावामध्ये बदल करणे इत्यादी कामे करून देतात. आरोपी लोकसेवक हे म.रा.वि.वि.कं. चे वायरमन असून त्यांच्याकडून त्यांच्या हद्दीमध्ये नवीन विद्युत मीटर जोडणीकरीता आवश्यक असलेला फिल्ड सर्वे केला जातो. आणि त्यानंतर नवीन विद्युत मीटर जोडणीची प्रक्रिया सुरू होते. तक्रारदार यांच्याकडून नवीन विदयुत मिटर जोडणीकरीता म.रा.वि.वि.कं. कडे दाखल केलेल्या १४ ग्राहकांचे सर्वे करून दिल्याचा मोबदला तसेच नव्याने सादर करण्यात येणाऱ्या ७ ग्राहकांचा सर्वे करून देण्यासाठी आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे ५०००/– रु लाचेची मागणी करीत असल्याबाबतची तक्रार दिनांक ०६/०९/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयात प्राप्त झाली.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दि.०७/०९/२०२३ रोजी पंचासमक्ष आलोसे हे लाचेच्या रक्कमेची मागणी करतात अगर कसे यांची पडताळणी केली असता, नमुद आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडून नवीन विदयुत मिटर जोडणीकरीता म.रा.वि.वि.कं. कडे दाखल केलेल्या १४ ग्राहकांचे सर्वे करून दिल्याचा मोबदला तसेच नव्याने सादर करण्यात येणाऱ्या ७ ग्राहकांचा सर्वे करून देण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे ५४००/– रु लाचेची मागणी करून तडजोडीनंतर ४,०००/–रूपये स्विकारण्याचे मान्य केले असल्याने त्यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास चालु आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर प. ४०१ ४०४.
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– dypacbpalghar@gmail.com
ऑनलाईन तक्रार :– ––
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री नं. :– 1064
दुरध्वनी कमांक :– 02525-297297
व्हॉट्स ॲप क्र. :– 9423884745, 9404218543

3/11/23
(दयानंद गावडे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर

Scanned with CamScanner